सचित्र संत महिपती ताहराबादकर

सचित्र संत महिपती ताहराबादकर

विजय प्रभाकर नगरकर

BookMedia Publishing House
Pondicherry, 605001, India

Copyright © 2020 Vijay Prabhakar Nagarkar
ISBN: 978-81-949137-0-2

सचित्र संत महिपती ताहराबादकर
विजय प्रभाकर नगरकर

All rights reserved. No part of this book may be reproduced or used in any manner without written permission of the copyright owner except for the use of quotations in a book review.

Published by BookMedia
www.bookmedia.co
info@bookmedia.co

सतराव्या शतकात देश भ्रमण करून ज्यांनी महाराष्ट्रा बाहेरील 116 व महाराष्ट्रातील 168 संतांची चरित्रे सुबोध रसाळ वाणीत लिहुन प्राचीन मराठीचे भांडार समृद्ध केले त्या संत महीपति महाराज यांच्या चरणी समर्पित

भूमिका

संत चरित्रकार , कवी श्री महिपती ताहराबादकर यांच्या जीवनकार्यावर आधारित सचित्र पुस्तक वाचकांच्या हाती सोपवताना अत्यंत आनंद होत आहे. महाराष्ट्र अन्य राज्यातील सुप्रसिद्ध संतांचा परिचय संत महिपती यांनी त्यांच्या ' श्री भक्त विजय' ग्रंथाद्वारे काव्यमय रसाळ भाषेत सतराव्या शतकात करून दिला. संतचरित्राचा अभ्यास करताना संत महिपती कृत भक्त 'विजय' व 'संतलीलामृत' ग्रंथांचा संदर्भ घेणे आवश्यक मानले जाते. या ग्रंथाचे पारायण महाराष्ट्रातील सर्व ग्रामीण भागात आजसुद्धा केले जात आहे.

संत महिपती यांच्या 'भक्त विजय' ग्रंथाचा इंग्रजी भाषेतील अनुवादही जगात पोहोचला आहे.

आमचे पूर्वज संत कवी 'संत चरित्रकार महिपती' यांच्या जीवनकार्यावर अहमदनगरचे सुप्रसिध्द चित्रकार श्री. वसंत विठणकर यांच्या कुंचल्यातूनन चित्रमय मालिका तयार करून घेतली आहे.

श्री. वसंत विठणकर यांनी परिश्रमपूर्वक सुंदर चित्रे रेखाटली आहेत. त्यांनी अनेक धार्मिक मंदिर व संतावर सचित्र पुस्तक संपादन कार्य केले आहे. बालपणी मुंबई येथील सेंट्रल प्रकाशन द्वारे प्रकाशित अनेक धार्मिक सचित्र पुस्तके वाचली आहेत. कधीकाळी श्री. वसंत विठणकर हे सेंट्रल प्रकाशनमध्ये चित्रकार व कलाकार नात्याने नोकरी करीत होते हे त्यांच्या कडून समजले,तेव्हा अपार आनंद झाला.

महिपती महाराजांचे संत चरित्राचे कार्य महाराष्ट्रात तसे दुर्लक्षित झाले आहे. नवीन पिढीला इंटरनेट, मोबाइल द्वारे संत महिपती महाराजांच्या कार्याचा परिचय व्हावा हीच सदिच्छा बाळगून हे ई-पुस्तक प्रकाशित करीत आहोत.

या पुस्तकातील सुरेख आकर्षक चित्रमालिका तयार केल्या बद्दल मी चित्रकार श्री वसंत विठणकर यांचा हार्दिक आभारी आहे. तसेच ताहाराबाद येथील ह.भ.प. श्री बाळकृष्ण कांबळे महाराज यांनी काही फोटो व चित्रे उपलब्ध करून दिली आहेत.मी त्यांचा ऋणी आहे.

- विजय प्रभाकर नगरकर

(ताहराबादकर)

चित्रकार भूमिका

संत कवी महिपती महाराज ताहराबादकर यांचे अलौकिक चरित्र गाथा चित्रमय करण्याचे भाग्य मला लाभले याचे सर्व श्रेय श्री विजय प्रभाकर नगरकर यांना आहे. त्यांचे मौलिक मार्गदर्शन आणि प्रेरणा मिळाली म्हणूनच हे चरित्र मी चित्रीत करु शकलो.

ही चित्रे काढताना मी अक्षरश या माहितीमुळे महिपतीमय होऊन गेलो होतो. त्यांचे व्यक्तिमत्त्व व त्या काळातील वातावरण त्याचा नीट अभ्यास व्हावा म्हणून मी श्री नगरकर यांच्याबरोबर ताहरबाद गावी गेलो होतो. त्यांचा वाडा मंदिर समाधी स्थळ पाहून हरखून गेलो. एवढ्या छोट्याशा खेड्यात राहून त्यांनी 284 संतांची चरित्रे, अभंग, ग्रंथ एवढी मोठी साहित्य निर्मिती कशी केली असेल याचे अप्रूप वाटले.

त्या काळातील सामाजिक स्थिति व प्रसंगा बरोबर चमत्कार हा संतांच्या जीवनातील अविभाज्य भाग असतो. श्री महिपती महाराजांच्या चमत्कारातून त्यांच्या जनहिताचा आणि सामाजिक कर्तृत्वाचा दृष्टिकोन दिसून येतो.

हे सगळे अगदी अद्भुत असल्यामुळे त्यांच्या चरित्राचे लेखन नाट्यमय पद्धतीने करताना , चित्रमय करताना हरखून गेलो. हे सर्व करताना मी धन्य झालो असे मला वाटत होते. अर्थात हे सगळे महीपति महाराजांनी माझ्याकडून करून घेतले असे मला वाटते. ही चित्रकथा करण्यासाठी विजय नगरकर यांनी बहुमोल मार्गदर्शन केल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे तसेच संत महिपती यांचे वंशज स्व. नाना महाराज वनकुटेकर कृत संत महिपती चरित्र तसेच वरिष्ठ कवी चंद्रकांत पालवे यांनी लिहिलेल्या पुस्तकाचा व मार्गदर्शनाचा लाभ झाला. दोघांचा मी आभारी आहे.

या चित्रांची रंग भरणी व संगणकाचे कार्य चिरंजीव हेमंत वसंत विटणकर यांनी अतिशय सुंदर केल्यामुळे निश्चितच चित्र कथेच्या सौंदर्यात भर पडली आहे. त्याचे आभार मानणे। औपचारिक होईल असे वाटते पण आभार मानणे हे माझे कर्तव्य समजतो.

चित्र निर्मिति करताना सर्वांच्या प्रेरणेमुळे ही चित्रकथा साकार होऊ शकली म्हणून या सर्वांचा मी ऋणी आहे.

चित्रकार निवेदक

वसंत विटणकर

श्री संत महिपती महाराज -परिचय

समाजात संतांचे कार्य निश्चितच फार मोलाचे आहे. ईश्वर भक्ती व पारमार्थिक जीवनातील तत्वज्ञान उपदेश, ओवी, अभंगाद्वारे त्यानी वेळोवेळी व्यक्त केलेले आहे. प्राचीन मराठी साहित्यात संत परंपरेचा अभ्यस करताना संत महिपती महाराज रचित 'भक्ती विजय' व 'संतलीला मृत' या ग्रंथांचा आधार घ्यावा लागतो. मराठी भाषेतील रसाळ व काव्यमय चरीत्राची निर्मिती करणारा थोर संत महिपती महाराज यांचा जन्म 1715 रोजी राहुरी तालुक्यातील ताहराबाद येथे झाला. मुगल काळातील गावाचे कुलकर्णी पद सांभाळताना महाराजांनी दरवर्षी पायी पंढरपुर यात्रा चुकवली नाही. संतांचा संग, तुकारामांचा आशीर्वाद व प्राकृत मराठी भाषेची गोडी या संगमातुन महाराजांनी महाराष्ट्रा बाहेरील 116 व महाराष्ट्रातील 168 संतांची चरित्रे लिहुन प्राचीन मराठीचे भांडार समृद्ध केले आहे. "संतांची चरित्रे संपूर्ण! एकदाची ना कळती जाण!! तेव्हा जी झाली आठवण! ती चरित्रे लिहून ठेविली!!" या ओवीतूनच महाराजांची संत चरित्र शब्द बध्द करण्यामागची भुमिका स्पष्ट होते. तुकाराम महाराजांच्या समकालीन महिपती बुवांना तुकाराम यानांच गुरू मानले होते. संस्कृत भाषेतील बंदिस्त ईश्वर भक्ती सर्व सामान्यांच्या बोली भाषेत गंगेच्या रुपाने आणण्याचे पवित्र कार्य संत ज्ञानेश्वरांनी केले. त्यांचेच कार्य पुढे तुकाराम, नामदेव, एकनाथ यांच्या बरोबरीने महिपती बुवांनी चालविले. अठराव्या शतकात ग्रामीण भागातील जनतेत ईश्वर भक्ती जागृत करण्याकरीता संत चरित्र व्याख्यान व काव्य रुपाने साध्या सोप्या रसाळ मराठी भाषेत रचले गेले. संत कथा व्याख्यानात महाराष्ट्र रंगू लागला. दामाजी पंतांच्या मंगळवेढयाहून महिपती बुवांचे वडील दादोबा कांबळे आपल्या आजोळी ताहराबाद येथे स्थायीक झाले. दादोबाच्या याच मुलाने दुष्काळात आपले घर दामाजी पंता प्रमाणे गोर गरीबांकडून लुटवून घेतले. अल्प मिळकतीत आपल्याकडे जे आहे ते गरजुसांठी दान करणे या मागे समाजहिताची फार मोठी व्यापक दृष्टी लागते. संतांची वैशिष्टये हेच सांगतात की 'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले' हाच उपक्रम त्यानी पुढील तीन दुष्काळात आरंभिला. वारकरी संप्रदायातील नम्र भाषा प्रभु उदारवादी व पांडुरंग भक्त महिपती महाराज पेशवाईत लोकप्रिय न झाले असते तरच नवल होते.श्रीमंत बाजीराव पेशवे व त्या नंतर मल्हारराव होळकर यांनी महिपती महाराज यांच्या वंशाकरीता जमीन व मान पत्र केल्याची नोंद आहे. संतसाहित्याचे अभ्यासक श्री.रा.चि.ढेरे म्हणतात "महिपती महाराजांच्या ग्रंथांनी सतत दीडशे दोनशे वर्षे ग्रामीण महाराष्ट्रातील लोकमानस सात्विक संस्कारांनी भारुन टाकले होते. काल परवा पर्यत ग्रंथांचीच प्रतिष्ठा सार्वत्रिक होती. हा प्रभाव दुर्लक्षण्याजोगा नाही. संत प्रितीतुन प्रकट झाले आहे. या महान कार्यासाठी महाराष्ट्राने महिपतीचे ऋण प्राजळपणे मान्य करावयास हवे." दरवर्षी पंढरपुर आळंदी यात्रा करून महाराजांनी संपूर्ण भारत यात्रा केली होती. उत्तर भारतातील मीरा, कबीर, सुरदास, नरसी मेहता यांच्या बरोबर नामदेव, तुकाराम, रामदास या महाराष्ट्रातील संतांचे चरित्र मोठया मेहनतीने एकत्र करून मराठीत आणले आहे त्यांच्या या प्राचीन साहित्याचा अभ्यास श्री.वि.वा.राजवाडे, श्री.रा.चि.ढेरे, श्री.भा.ग.सुर्वे, श्री.प्र.रा.भांडारकर, श्री.वि.ल.भावे, सौ.उषाताई देशमुख, श्री.सुरेश जोशी या मान्यवरांनी केला आहे. महाराष्ट्रात सन 1885 ते 1910 काळात 'ज्ञानोदय' या ख्रिश्चन धर्म पत्रिकेचे संपादक रे.जस्टीन एडवर्डस अँबट यांनी महिपती महाराजांच्या 'भक्त विजय' 'भक्त लीलामृत' व 'संत विजय' या ग्रंथाचे इंग्रजी भाषांतर केले आहे. महिपती बुवाच्या या संत चरित्रांचा परिचय रे.अँबट यांनी अमेरीकन विद्वानांना करून दिला. ख्रिश्चन धर्म प्रचारक असुन सुध्दा त्यांनी मराठी संतांचा गाढा अभ्यास केला होता. रे.अँबट यांचे इंग्रजी भाषांतर महाराष्ट्र कवी संत माला (The poet saints of Maharashtra series) या नावांने सुप्रसिद्ध आहे. 'भक्त विजय' ग्रंथाचा अनुवाद करताना त्यांनी डिक्टाफोनचा वापर केला होता. या डिक्टाफोनवर शब्द बद्ध केलेले त्यांचे भाषांतर नंतर कागदावर उतरवले गेले. शनिशिंगणापुराचे नाव

भारतात सर्वदूर प्रसिद्ध झाले आहे. महिपती महाराजांनी 'शनी महात्म्य' ग्रंथाची निर्मिती केलेली आहे. मराठी साहित्याचा प्रवाह संत चरित्रातून त्यानी प्रवाहित केला. त्याच महिपतींच्या जन्मगावी आज मोठे प्रशस्त भव्य मंदिर उभे आहे. संत महिपती महाराज देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष श्री.रावसाहेब साबळे पाटील दरवर्षी निष्ठेने ताहराबाद ते पंढरपुर पायी पालखी काढतात. या पालखीमध्ये राहुरी, श्रीरामपुर, संगमनेर, पारनेर, व अहमदनगर येथील हजारो विठ्ठल भक्त सामिल होतात. या ट्रस्टमधे महिपती महाराजांच्या वंशातील श्री. अविनाश मुरलीधर कांबळे, ह.भ.प.पांडुरंग जनार्धन कांबळे व श्री.संजय तुकाराम कांबळे यांचा समावेश आहे. महिपती महाराजांचे अनेक ग्रंथ अद्याप अप्रकाशित आहेत. काही हस्तलिखिते महाराजांच्या वंशजांकडे भक्तिभावाने सांभाळून ठेवली आहेत. महिपती यांचे हस्ताक्षर सुंन्दर आहे. महाराजांच्या अनेक पोथ्या पुणे, मुंबई येथील संशोधकानी हस्तगत केल्या आहेत. कांबळे घराण्यातील बहुतेक कुटुंबे पोटा पाण्यासाठी व्यवसायानिमित महाराष्ट्रात, कर्नाटकात व मध्य प्रदेशात पांगले आहेत. श्रीक्षेत्र ताहराबाद येथील उत्सव आषाढ शुध्द १० पासुन अमावस्ये पर्यंत असतो. त्रेयोदशीला काला, चतुर्दशीस तळीत पहाटे पाऊलघडीची पुजा झाली की उत्सव संपतो. पाऊलघडी म्हणजे महिपती महाराजांच्या पाऊलांचे लाल ठसे धवल वस्त्रावर प्रकटतात अशी ग्रामस्थांची श्रद्धा आहे. या श्रद्धेला आधार काय असु शकतो याचा विचार केला की वाटते महिपती बुवांनी पंढरीची पायवारी कधी चुकवली नाही. विठ्ठलाच्या दर्शनाला जाताना महाराजांच्या पायात काटे रुतत असावेत व रक्ताळलेल्या पावलांनी ती वारी संपन्न होत असावी. त्याचीच आठवण येथील सश्रद्ध भाविक पाऊलघडी कार्यक्रमा द्वारे व्यक्त करीत असावेत. मी एका उत्सवाला गेलो होतो. तेथील ग्रामस्थांनी रचलेले सोंगे पाहुन चकित झालो. दिवसभर शेतात राबणारे अडाणी शेतकरी सोंगे आणताना असा काही अभिनय करतात की राजस्थानी राजपुताचे घोड्यावर स्वार होत केलेले सोंग मी कोणत्याच नाटकात, चित्रपटात पाहिलेले नाही. महिपती बुवांना मराठी भाषे व्यतिरीक्त गुजराती, हिंदी व कानडी भाषा अवगत होती. संपूर्ण भारत भ्रमंतीतुन त्यांनी त्याकाळी विविध भागातील लोक कलेचा संस्कार आपल्या ताहराबादला आणला होता. या उत्सवात महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकार, प्रवचनाकार एकत्र जमतात. वारकरी संप्रदयालील संतांचे उदार धोरण व हिंदु धर्मातील कर्मकांडाला त्यांनी केलेला तीव्र विरोध प्रकर्षाने भावतो.नाम स्मरण व सदाचार हिच ईश्वर सेवा ते मानतात. सुख सुविधे मुळे आज आपण बंगला, गाडी, पैसा, नोकरी, व्यवसाय,सत्ता, राजकारण यालाच देव मानु लागलो आहोत.कदाचित तुम्ही नास्तिक असाल परंतु मानवता, बंधुता व प्रेम या मानवी मुल्यांच्या मुर्तीचा विध्वंस करून स्वत:चे मोठेपण सिध्द करु शकणार नाहीत.संतांचे हे मोठेपण आपण कधीच खुजे करू शकणार नाही. भारतीय संस्कृतीचे मुल्य अबाधित ठेवण्यात संतांचा फार मोठा वाटा आहे हे विसरून चालणार नाही. अशा सर्व संतांचा परिचय आपल्याला करून देणारे संत चरित्रकार महिपती बुवांचे उपकार कोणालाच विसरता येणार नाहीत. ताहराबाद येथील संत महिपती देवस्थान ट्रस्टचा कारभार वाढला आहे. दरवर्षी ताहराबाद येथुन पंढरपुरला भव्य पालखी व पायी वारी निघते. याचे सुंदर नियोजन होत आहे.

ताहराबाद येथील देवस्थानात त्यांच्या जीवन चरित्रावर आधारीत चित्रमय गॅलरी उभी राहावी व तेथे एका दुर्लक्षीत संत महिपती बुवांचे गांव हे धार्मिक पर्यटन स्थळ व्हावे हीच सदिच्छा व संत महिपती बुवांच्या चरणी शतश: वंदन.

- विजय प्रभाकर नगरकर

अहमदनगर, महाराष्ट्र

vpnagarkar@gmail.com

श्री संतकवी-ताहराबादचे
श्री महिपती महाराज
निवेदन व चित्रांकन
वसंत विटणकर
अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी पासून पश्चिमेकडे सुमारे १८ कि.मी.अंतरावर ‘ताहराबाद’ हे छोटेसे सुंदर खेडे आहे.
ताहराबादचे मूळ नांव ‘वर्जुवाडी’ होते पण मोगल बादशहाने हे गाव ताहिरखान नावाच्या सरदारास दिले होते म्हणून वर्जुवाडीचे नाव ‘ताहराबाद’ असे झाले.
याच गावात विठ्ठलपंत कुलकर्णी हे विद्वान-सत्त्वशील ब्राह्मण रहात होते.
आमच्या घराण्यात अनेक पिढ्यांपासून पंढरीला जाण्याचा नियम आहे.
मला गंगूबाई नावाची एकुलती एक उपवर मुलगी आहे. तिचं लग्न झालं की मोठी काळजी दूर होईल.
1

आता पर्यंत आपल्या वारीची तीन चार तपे पूर्ण झाली आहेत. मी साठीत पदार्पण केले आहे तरी सुध्दा आपल्याला मूल-बाळ झाले नाही तुझ्या मनांत पण हेच दु:ख आहे हे मला माहित आहे.
Vasant Vitankar # 9860907196
एकदा चंद्रभागेचे स्नान आटोपून दादोपंत पांडुरंगाच्या ओवरीत आले.
पांडुरंगा आता शरीर थकले आहे रे, मूल-बाळ नसल्यामुळे यापुढे वारी खंडीत होते की काय? अशी भीती वाटते.
पांडुरंग कृपा करील. तुझ्या पोटी एक महान भगवद्भक्त जन्म घेईल.
हे तेजस्वी यतीराज म्हणजे दत्तावतार श्री नृसिंहसरस्वती तर नसतील ना?
हा पेढ्याचा प्रसाद तुझ्या पत्नीला दे म्हणजे तिला विठ्ठलभक्त पुत्र होईल.
रात्री दादोपंतांच्या स्वप्नात देव आले.

देवाने प्रसाद म्हणून दिलेला हा पेढा खा. आपल्या पोटी महान् भगवतभक्त जन्म घेणार आहे.
लवकरच गंगूबाई गरोदर होऊन ताहराबाद येथे शके १६३७ (इ.स.१७९५) मध्ये त्यांना पुत्रप्राप्ती झाली.
वयाची साठी उलटली असतांना सुध्दा मला पुत्रप्राप्ती व्हावी ही एक अघटीत घटनाच झाली. पांडुरंगा, माझी वारी तू अखंडीत केली आहे.
बाळाच्या बारशालाच त्याचा नामकरण सोहळा झाला पाळण्याची पहिली दोरी ओढण्यासाठी महिलांची चढाओढ सुरु झाली. या गर्दीत वाट काढीत एक अनोळखी म्हातारी बाई पुढे पुढे येत होती.
या म्हाताऱ्याबाई कोण आहेत ? या पूर्वी त्यांना कधी पाहिल्याचे आठवत नाही.
मला दोरी ओढू द्या
मला पण पाळण्याची दोरी ओढू द्या हो !
काही असो. पुढे पुढे जाण्यासाठी त्या धडपडत आहेत. त्यांना पाळण्याजवळ घेऊन जा.


आपण कोण आहात ? कोठून आल्या आहात ?
मी पंढरपूरच्या पांडुरंगास भेटावयास चालले आहे. येथे हा उत्सव पाहिला व आले. माझं ऐका, बाळाला कुंकूम तिलक लावा व त्याचे नाव 'महिपती' असेच ठेवा.
पाळण्याची दोरी ओढून म्हातारी गुप्त झाली.
आश्चर्य आहे ! म्हणजे साक्षात् त्या रुक्मिणी देवीच होत्या. त्यांच्या सांगण्याप्रमाणे बाळाचे नाव 'महिपती' ठेवा.
Vasant Vitankar # 9860907196
बाळ महिपती वाढत होता. वयाच्या सातव्या वर्षी त्याची मुंज करण्यात आली. त्याला ताहराबाद पासून बारा कि.मी.अंतरावरील तांभेरे गावातील मोरेश्वरशास्त्री यांच्याकडे शिक्षण व वेदाध्यायनासाठी पाठविले.



Vasant Vitankar # 9860907196

Vasant Vitankar #9860907196

त्या दगडाच्या देवाच्या नादी लागू नकोस ; फेकून दे तो दगड !
राजसेवेचा चाकर झालो म्हणून माझ्या देवाला नको ते बोललेले ऐकून घ्यावे लागले. अशा जगण्यांत काय अर्थ आहे ? बस् ठरलं..... या नोकरीचा त्याग केला पाहिजे आणि देवाच्या सेवेत रुजू झालं पाहिजे.
खानसाहेबांनी सोपविलेले काम पूर्ण करून गावच्या कुलकर्णी पदाचे दप्तर घेऊन महिपती खानसाहेबाकडे आले.
मी माझे दप्तर आणि राजीनामा आपल्यापुढे सादर करीत आहे, खान साहेबाने मला चाकरीतून मुक्त करावे ही विनंती आहे. 'जया सुवर्णे तुटती कान । ते कासया पाहिजे कांचन ।'
थांबा, असा अविचार करू नका. आम्हांला आपली चाकरी आणि सहवास दोन्ही प्रिय आहेत आपण आपला इस्तिफा परत घ्या.
माफ करा. पण जे ठरले ते ठरले त्यात आता बदल नाही. माझा राजीनामा स्वीकारा.
Vasant Vitankar # 9665632531
राजीनामा देऊन महिपती घरी आले व तडक देवघरात गेले.
देवा, मी प्रतिज्ञा करतो की यापुढे मी आणि माझ्या सात पिढ्यात कोणीही कुलकर्णी पदाची लेखनी हातात धरणार नाही. माझ्यानंतर जर कोणी या पदाची लेखनी हातात धरली तर त्याचा वंश खंडित होईल.......
अशी घोर प्रतिज्ञा करून महिपतींनी आपली लेखनी पांडुरंगाच्या पायाशी ठेवली.

Vasant Vitankar # 9665632531


तू लिही
पांडुरंग । पांडुरंग ॥
हा सारखा असाच बडबडत असतो याला वेडबीड तर लागलं नाही ना !!
उन्मनी अवस्थेत महिपती सारखे पांडुरंगाचे नाव घेत असत.
अशाच अवस्थेत महिपतीना साक्षात्कार झाला.
महिपती, तुझा जन्म वेगळ्या कामासाठी झाला आहे. ही घे लेखनी आणि आता संत-चरित्र लिहिण्याचे कामास लाग.
आपणच माझे गुरु व्हा.
जशी तुझी इच्छा
संत तुकाराम महाराजांना गुरुस्थानी मानून आणि पांडुरंगाचा आशीर्वाद घेऊन मी लिहिण्यास सुरुवात करीत आहे.....श्री गणेशाय नमः ।
Vasant Vitankar #9665632531
६० अभंग
शांति महात्म्य
पंढरी महात्म्य (१२ अध्याय)
एका मागे एक ग्रंथ लिहिले जात होते आणि महाराज लिहितच होते.

Vasant Vitankar # 9665632531

महिपती महाराजांचे लेखन अखंडीत चालू होते. त्यातून त्यांची साहित्य संपदा निर्माण होत होती.
॥अनंत व्रतकथा॥ १८६ ओव्या
॥ श्री दत्तात्रय जन्म ॥ ११२ ओव्या
॥ गणेश पुराण ॥ ४ अध्याय
॥ तुळशी महात्म्य ॥ ७६३ ओव्या
॥ ऋषि पंचमी ॥ १४२ ओव्या
॥ मुक्ता भरण स्तोत्र ॥ ९०९ ओव्या
॥ पांडुरंग स्तोत्र ॥ १०८ ओव्या
Vasant Vitankar # 9665632531

देव चोरोनी नेईल
ऐसी कोणाची पुण्याई
महिपतीच्या ग्रंथलेखनामुळे आणि कथा-किर्तनामुळे त्यांचा जिकडे तिकडे उदो उदो होत होता. हे काही वाईट आणि दुष्ट लोकांना सहन होत नव्हते.
हा महिपती पक्का ऐतखाऊ आहे. चांगली दरबारातली नोकरी सोडून देव भक्तीचा नुसता देखावा करुन लोकांना झुलवतो आहे. याचा चांगला बंदोबस्त केला पाहिजे.
तो सदान् कदा विठ्ठलमूर्तीसमोर बसून काही वाही ग्रंथ लिहित असतो.
असेच असेल तर त्याची ती विठ्ठलाची मूर्ती आणि ग्रंथ आपण चोरून आणू.
असे केले तर तो दुःखाने कदाचित् आत्महत्त्या सुध्दा करील.
तू चोरी करण्यात पटाईत आहेस. तू ती विठ्ठलाची मूर्ती आणि ग्रंथ चोरून आण. हा पाटलाचा हुकूम आहे असं समज.
जशी आपली आज्ञा.
चोरांनी चोरी करताच....
असं काय झालं ? मला दिसेनासं झालं.
12

Vasant Vitankar # 9665632531


अरे ऽऽ रे !! तू फार वाईट काम केलं.... त्याची शिक्षा तुला लगेच मळाली आहे. यातून सुटका पाहिजे असेल तर मी तुला महिपती महाराजांकडे घेऊन जातो. तू त्यांना शरण जा तेच तुला परत दृष्टी देऊ शकतील.
खरं आहे. कृपा करुन मला त्यांच्याकडं घेऊन चल.
मी चोरलेली त्यांची विठ्ठलमूर्ती आणि ग्रंथ त्यांना परत करीन व त्यांची क्षमा मागेन.
चोराने मूर्ती आणि ग्रंथ महाराजांना परत केला.
असं वाईट काम परत करुं नकोस देवाला कोणी चोरून नेऊ शकेल काय ?
देवा याला क्षमा कर त्याची दृष्टी त्याला परत दे.
महाराजांनी चोराच्या डोळ्यावरुन हात फिरविला आणि त्याला दृष्टी प्राप्त झाली.
मला दिसायला लागलं.
मला नजर आली.
आपल्या कृपेने मला नजर आली. आता मी माझे आयुष्य आपल्या सेवेत घालविणार आहे. माझा स्वीकार करा.
Vasant Vitankar # 9860907196

दुष्काळ
एकदां मोठा दुष्काळ पडला. ‘करंडीचे साल’ म्हणून तो प्रसिध्द आहे. अन्न पाण्यावाचून माणसं,जनावरे तडफडून मरुन जात होते.
महाराज, आम्ही तीन-चार दिवसांपासून भूकेलेले आहोत काही खायला मिळेल का ?
काळजी करुं नका. मी तुमची सोय करतो.
महाराजांच्या पत्नीने अन्न शिजविले.
हे घ्या आणि खाऊन तृप्त व्हा,दुष्काळाची चिंता करुं नका.
घरी बायका-मुलं उपाशी असतांना इथं हे खायला मन लागत नाही.
हे खरं आहे !
लोकांचे हे हाल पहावत नाहीं. घर लुटविण्याचे ठरविले आहे. तुझी संमती आहे ना ?
तुमच्या इच्छे विरुध्द आम्ही नाही
मी या घरावर तुळशीपत्र ठेवून घर लुटविणार आहे. तुम्हांला जे पाहिजे ते घेऊन जा व सुखी रहा.
Vasant Vitankar # 9860907198

महाराजांनी घरावर तुळशीपत्र ठेवले.
नगरवासियांनो आपण घर लुटून नेऊ शकता सुखी रहा.
दुष्काळग्रस्त नगरवासियांनी आपले घर व त्यांतील हाती लागेल ते सामान लुटून नेले आहे. ते आता सुखाने दोन घास तरी खाऊं शकतील. मी आतां निष्कांचन झालो आहे. पण अंतर्यामी पूर्ण सुखी आहे.
एवढं भरलं घर मी लोकांकडून लुटवून घेतलं पण आपण कोणीही किंचित सुध्दां नाराजी व्यक्त केली नाही. हा सर्व तुमच्या सर्वांच्या मनाचा मोठेपणा आहे. त्या बद्दल मी आपला कृतज्ञ आहे.
त्यात काय विशेष ? आपल्या सुखातच आमचं सुख आहे.
Vasant Vitankar # 9860907196

महिपती महाराजांनी घर लुटविल्याची हकिगत जहागिरदाराला समजली.
खाविंद महिपतीने स्वत:चे घर दार लुटवून दुष्काळग्रस्तांची मदत केली आहे.
महिपतीच्या कामाची तारीफ करावी तेवढी कमीच आहे. आपण सुध्दा त्याच्या कामात त्याला मदत केली पाहिजे.
आपण केलेल्या त्यागाची हकिगत खाविंदाना समजली आहे. त्यांनी मुद्दाम आपल्यासाठी बारा गाड्या भरुन धान्य पाठविले आहे. त्याचा स्वीकार करावा.
क्षमा करा. मला कोणाच्याही मदतीची गरज नाही. पांडुरंग मला सर्व देतो. आपण हे धान्य परत घेऊन जा व माझे आभार सांगा..
काय ? मदत परत पाठविली ? त्या महान संताचे मला दर्शन घेतलेच पाहिजे. चला, त्यांना भेटू.
महिपती, आपण खरे अवलिया आहात माझा नमस्कार स्वीकारा.


व्याधी मुक्त
एक कुष्ठरोगी आजाराने त्रस्त झाला होता
मी आत्महत्या करण्याचा विचार करीत आहे.
तू महिपती महाराजांकडे जा ते तुझी व्याधी दूर करतील.
महाराजांकडे ताहराबादला जाईन
तुझी व्याधी दूर करणे माझ्या हातात नाही. पण तू हट्टच धरला आहेस म्हणून मी आत जाऊन पांडुरंगालाच विचारून येतो.
थोडावेळ ध्यान लावून महाराज मंदिरातून बाहेर आले.
देव धुतल्यावर गोमुखातून निघालेल्या पाण्याने तू स्नान कर. पुढे पांडुरंगाची इच्छा !!
महिपती महाराजांनी विठ्ठलाला स्नान घालण्यासाठी एक गडवाभर पाणी ओतले.
कमाल आहे ! आपण फक्त गडवाभर पाणी ओतले पण पहावे तर इकडे बादली पाण्याने पूर्ण भरली आहे.
याच पाण्याने तू स्नान कर पुढे पांडुरंगाची मर्जी !!


महारोग्याने बादलीतील पाण्याने आंघोळ केली.
हा SS हा SS हा !! माझे अंग स्वच्छ झाले मी व्याधी मुक्त झालो.
आपल्या कृपेने मी रोगमुक्त झालो. आता मी आपले चरण सोडणार नाही. आपला सहवास मला पाहिजे.
ही सर्व विठ्ठलाची कृपा आहे. पण तू रोगमुक्त झाला आहेस हे जर गावात समजले तर मला फार त्रास होईल म्हणून माझे ऐक, तू हे गाव सोडून ताबडतोब बाहेर जा.
मी आपल्या आज्ञेबाहेर नाही मी लगेच राहुरीतील रामबुवांच्या आश्रमात जातो. मला आशीर्वाद द्या.
राहुरी येथील रामबुवांच्या आश्रमात ते रहायला गेले पण...
माझे मन तेथे लागत नाही. म्हणूनच मी वारंवार ताहराबादला येतो. या वाड्यातील विठ्ठल-मंदिरावर गोपुर बांधून त्यावर कळस लावण्याची माझी फार इच्छा आहे.

काही दिवसांतच रोगमुक्त झालेल्या भक्ताने वाड्यातील मंदिरावर गोपुर बांधून कळस चढविला.
आपला आशीर्वाद आणि पांडुरंगाच्या कृपेमुळेच मी हे गोपुराचे आणि कळसाचे काम करूं शकलो.
आयुष्यभर त्याने महाराजांची व पांडुरंगाची सेवा केली.
महिपती महाराजांच्या कृपेमुळे कुष्ठरोगी बरा झाला आहे. आपण त्यांना शरण जाऊ आपला पण रोग ते बरा करतील.
महाराजांच्या कृपेमुळे अनेक रोगी रोगमुक्त झाले.
रोग्यांच्या गर्दीमुळे मला शांतता मिळत नाही. पण जन -कल्याणासाठी हे सर्व करणे आवश्यक आहे.
आजही महाराजांच्या समाधीचे दर्शन घेऊन त्यांनी बांधलेल्या विहिरीतील पाण्याने लोक स्नान करतात व व्याधीमुक्त होतात अशी समजूत आहे.

ब्रह्म समंधांचा उध्दार
एकदा संत निवृत्तीनाथांच्या दर्शनासाठी दिंडी घेऊन महिपती महाराज त्र्यंबकेश्वरला जात असताना नाशिकला आले.
मुलांनो, आम्हाला मुक्कामासाठी येथे एखादी सोयीस्कर जागा मिळेल का ?
यांची जरा गंमत करावी हं !
मुक्कामासाठी मी अगदी चांगली जागा दाखवितो. आपण येथून सरळ जा. तेथे एक पडका वाडा दिसेल तेथे खुशाल मुक्काम करा.
मुलांनी सांगितल्याप्रमाणे महिपती महाराज दिंडी घेऊन जुन्या वाड्यात मुक्कामासाठी आले
हा ऽऽ हा... हां !! वारकरी जुन्या वाड्यात उतरले खरे, पण तेथे दोन मोठे ब्रह्म समंध रहात आहेत. हे त्यांना कुठं माहीत आहे !!
ते जागृत झाले की यांची खूप फजिती करतील त्यांना घाबरवून सोडतील मजा येईल
रात्रीचे बारा वाजले अन् ब्रह्मसमंध जागृत झाले
अरे व्वा !! आज बरीच मंडळी आलेली दिसतात. आता, आपण त्यांना घाबरून टाकू त्यांची फजिती करु.
ब्रह्मसमंधानी वारकऱ्यांना आपला प्रताप दाखववायला सुरुवात केली.
बाप रे !! कोणीतरी मारतंय असं वाटतं.....
Vasant Vitankar # 9665632531

मला कोणीतरी उचलून फेकून देत आहे असं वाटतं !
मला कोणीतरी दणके मारत आहे असं वाटतं !
माझ्या छातीवर कोणीतरी बसलं आहे असं वाटतं !
थांबा, घाबरू नका, पळापळ करू नका शांत व्हा.
हे ब्रह्मसमंधांनो, माझ्या वारकऱ्यांना त्रास देऊ नका. शांत व्हा. समोर या.
महिपती महाराजांनी बोलावताच ब्रह्मसमंध त्यांच्यासमोर प्रकट झाले.
महाराज, आम्हाला क्षमा करा. पूर्वजन्मात केलेल्या वाईट कामाबद्दल आम्ही समंध झालो आहोत. आमचा उध्दार करा.
आपण हा वाडा सोडून वाराणशीस जा. भगवान शंकर आपल्याला मुक्ती देतील.
ब्रह्मसमंध वाराणशीस गेले भगवान शंकराने त्यांना मुक्ती दिली त्यांचा उध्दार झाला.

सर्पराजा तामस गुण टाकून दे
महिपती महाराज शिराळ चिचोंडी येथे मुक्कामाला होते.
महाराज मला वाचवा. एक सर्प माझ्यामागे लागला आहे. तो मला चावायला येत आहे.
तो पहा सर्प. चवताळून वेगाने इकडेचं येत आहे.
सर्पराज, तामस गूण टाकून द्या. या गरीब ब्राम्हणाला अभय द्या.
जन्म-जन्मांतरीच्या पाप कृत्यामुळे आपला जन्म हिंस्त्र योनीत झाला आहे, ब्राम्हणाच्या जिवाची मला भिक्षा द्यावी. पूरे झाला हा सूड आणि दंश करणे.
सर्पराज, आपल्या मार्गाने मार्गस्थ व्हा.
गावकऱ्यांच्या समक्ष सर्पाने महाराजांना तीन प्रदक्षिणा घातल्या आणि शांतपणे निघून गेला. ब्राम्हणाचा जीव वाचला आणि सर्पाला सद्‌गती मिळाली त्याचा उध्दार झाला.
23

सुंदरी
महाराजांच्या किर्तनात एक माकडीन नियमाने रोज येत असे. ती तल्लीन होऊन किर्तन ऐकत असे. भजनात ताल धरुन डुलत असे. तिला सगळेजण सुंदरी म्हणत असत.
साधी माकडीन आहे, पण भगवत भक्तीत रममाण होते.
काही कर्मठ मंडळींना माकडीनीने मंदिरात येणे आवडत नसे.
सकाळचे प्रहरी माकडीनीचे तोंड पहाणे म्हणजे अपशकूनच आहे. तिचा काहीतरी बंदोबस्त करा.
सुंदरी काही लोकांना तुझं तोंड पहाणं आवडत नाही म्हणून तू या रुमालाने तुझं तोंड झाकून घेत जा.

देवा, मी इतकी अपशकूनी आहे ?
तेव्हापासून सुंदरी तोंडापुढे रुमाल धरुन बसे.
काही असो. महाराजांनी सांगितल्याप्रमाणे मी माझा चेहरा या रुमालामागे झाकून घेईन
....पण सुंदरीने किर्तन-भजन ऐकणे सोडले नाही.
एके दिवशी सुंदरीने महाराजांच्या पायावर डोके ठेवले व देहत्याग केला..
विठ्ठल ! विठ्ठल !!
महाराजांनी स्वत: तिला अग्नीदाह दिला व तिचा उध्दार केला.


सहभोजन
आज दिंडीचा मुक्काम याच गांवात करावा असं वाटतं ! गावांत जर एखादे ब्राह्मणाचे घर असेल तर तेथे आमच्या भोजनाची सोय होईल का ते पहावे.
बर महाराज, मी गावांत ब्राह्मणाचे घर शोधण्यासाठी जातो.
संपूर्ण गांवात हे एकच ब्राह्मणाचे घर दिसते.
बाई साहेब, आमची दिंडी याच गांवात आज उतरली आहे. आमच्या महाराजांची आपल्याकडे भोजनाची व्यवस्था होईल का ?
माझे धनी बाहेर गेले आहेत. तरी पण महाराजांनी आमच्याकडे भोजनाला यायला हरकत नाही.
महिपती महाराज ब्राह्मणाचे घरी आले.
यावे महाराज, सुस्वागतम्.माझे पती इतक्यांत येतील तोपर्यंत आपण आपली स्नान संध्यादी कृत्यें आटोपून घ्यावी.

Vasant Vitankar # 9665632531



ब्राम्हण पत्नीने गोडधोड उत्तम पक्वान्ने तयार केली व वाढली.
जावई बापू आणि महाराज थोडा उशीर झाला पण ताटं वाढली आहेत. जेवायला चला.
वाह्व्वा ऽऽ !! स्वयंपाक छान झाला आहे. सावकाश भोजन होऊ द्या.
छान ! आपल्याकडील सुग्रास भोजनाचा लाभ मिळाला. आनंद वाटला. आतां आम्ही निघतो. दिंडी पुढं काढायची आहे. उशीर नको.
मी महाराजांना दिंडीच्या मुक्कामापर्यंत पोहचवून परत येतो.
जावई बुवा, जशी आपली इच्छा पण लवकर परत या.
बराच वेळ झाला....
जावईबापू महाराजांना पोहचवायाला जाऊन बराच वेळ झाला पण अद्याप परत आले नाही.



Vasant Vitankar # 9665632531

Vasant Vitankar # 9665632531

Vasant Vitankar # 9665632531

Vasant Vitankar # 9665632531

ज्ञानेश्वर माऊलीचे दर्शन
कार्तिक वद्य पक्षात महिपती महाराज ज्ञानदेवाच्या दर्शनासाठी आळंदीला आले होते.
समाधीचे दर्शन घेऊन महाराज अजानवृक्षाखाली ध्यानस्थ बसले असताना.....
या अजानवृक्षाखाली बसून श्रध्देने पारायण केले तर ज्ञानेश्वरीचे उत्तम ज्ञान प्राप्त होते असं म्हणतात ते खरं आहे काय ?
माऊली, मी आपणांस ओळखले नसते तर हाच प्रश्न मी आपल्याला विचारला असता.
ज्ञानेश्वर माऊलीने लगेच प्रगट होऊन महिपती महाराजांना दर्शन दिले.
साक्षात् भगवंताचाच आपल्यावर वरदहस्त आहे. भगवत् भक्तांची वर्णन करणारी आपली वाणी आणि लेखनी जगाला तारकच होईल.

साक्षी विहीर
ही आपली किती तरी मोठी जमीन आहे पण ती नेहमी पडिक असते.
काय करणार ? या जमिनीला पुरेसे पाणी मिळत नाही. मला देवासाठीं रोज फुलें पानें पाहिजे असतात. पण पाण्याची सोय नसल्यामुळे फुल-झाडे लावता येत नाही.
पाण्यासाठी इथं आपण एखादी विहीर खणावी का ? म्हणजे येथे पाना-फुलांची झाडें लावता येतील.
असंच करा. देवाचं नाव घ्या अन् विहीर खणायला सुरुवांत करा.
महाराजांनी विहीर खणायला सुरुवात केली.
एवढं खोल खणलं पण पाण्याचा थेंबही सांपडण्याचा संभव दिसत नाही.
एवढ्यांत पाठीमागून जोरांत हसण्याचा आवाज आला..
हा.... हा
हा SS
हा...
हा !!
Vasant Vitankar # 9665632531
34

एका एकी एक बालक महाराजांसमोर आले.व जोरजोरात हसू लागले
हा SS हा... हा !! हसू नको तर काय करुं ? मला माहित आहे की इथं अजिबात पाणी लागणार नाही पण आपण जर पलिकडं त्या बांधा जवळ खणलं तर तिथं नक्कीच पाणी लागलं.
असं म्हणतोस तर मी तिकडं जाऊन जमीन खणून पहातो.
ते बालक निघून गेले.
चला, त्या मुलाने सांगितल्या प्रमाणे या बांधाजवळ खणून पाहू या !!
थोडं खणताच तेथून पाण्याचा छोटा झरा वाहू लागला.
कमाल आहे तेथे थोडे खणले तरी पाणी लागले. त्या बालकाने मला योग्य ठिकाण दाखविले.
Vasant Vitankar # 9665632531

खरंच,
कोण होते ते बालक ? परत दिसला पण नाही. मला वाटतं नक्कीच श्रीहरी बालकाच्या रुपाने आले होते. मला अधिक कष्ट पडू नये म्हणून मार्गदर्शन करुन निघून गेले. देवा, मला किती सांभाळशील रे ऽऽ !!
देवा,तू दाखविलेल्या पाण्यामुळे मला येथे फुलबाग करता आली. याच बागेतली फुले रोज तुझ्या पूजेत असतात.
महाराजांनी पाण्याच्या झऱ्याभोवती विहीर बांधली.
आजही ती विहीर 'साक्ष-विहीर' या नावाने प्रसिध्द आहे.

एकनाथ महाराजांचे दर्शन

प्रत्येक नाथ पष्ठीला महिपती महाराज पैठणला जात असत. पंचमी ते अष्टमी पर्यंत नाथांच्या समाधी मंदिरात ते नाथ चरित्राचे वाचन व निरुपण करीत असत. ते ऐकायला मोठी गर्दी होत असे त्यात एक तेजस्वी ब्राम्हण बसलेला असे.



यत्न तो देव जाणावा
महाराज आमच्या गावात पाण्याचा दुष्काळ आहे कित्येक मैला वरून पाणी आणावे लागते.
इतका पाण्याचा तुटवडा असताना आपण गावकरी काय करता ? एखादी विहीर का खणत नाही.
विहीर खणायला पैसा लागतो. गाव गरीब आहे. विहीर खणायला लागलो आणि पाणी नाही लागले तर सगळी मेहनत वाया जाईल.
गाव आळशी दिसते.
महाराजांनी एका गावकऱ्याकडून टिकाव, फावडे मागून घेतले व देवाची प्रार्थना केली.
देवा, या गावावर तू का कोपलास ? त्यांचे पाण्यावाचून होणारे हाल मला पहावत नाही. माझ्या कार्याला यश दे.
Vasant Vitankar # 9665632531
महाराज आपण हे काय करता ?
आपण एकटे विहीर खोदणार ?
मी तुम्हां गावकऱ्यांसाठी विहीर खोदतो.

आपण एकटे कसे काय विहीर खोदणार ? हे किती मोठे आणि कष्टाचे काम आहे !!
काय करणार गावाला पाणी नाही, गाव टिकवायचे असेल तर पाण्याचा शोध घेतलाच पाहिजे.
तुम्ही सगळे आळसामुळे काहीच हालचाल करीत नाही. अशाने गुरं-मानसं तडफडून मरतील गांव ओस पडेल. म्हणून वेळ लागेल, कष्ट पडतील पण मी पाण्यासाठी विहीर खोदणार आहे. प्रयत्नांती परमेश्वर हेच खरे.
खरचं, आपलं चुकलं. आपण सर्वांनी महाराजांना मदत केली पाहिजे. चला आपण कामाला लागू.
असं करणं आपल्याच हिताचं आहे
सगळे गावकरी महाराजाना मदत करण्यासाठी सरसावले.

Vasant Vitankar # 9665632531

Vasant Vitankar # 9665632531

रात्री तिच्या पतीला जाग आली.
आँ ss ! ही इथंच माझ्या शेजारी झोपली होती ना ! अन् आतां गेली कुठं ?
आई ती गेली वाटतं !
मी जाऊ नको म्हटलं तरी ती गेली. पहातेच आतां तिला चांगली अद्दल घडविते !!
महाराज, मी सासुरवाशिण आहे. गुपचूप आपल्या दर्शनाला आले
पांडुरंग सगळं ठीक करील.
नको जाऊं म्हटलं तरी इथं गुपचूप आली ना ? चल घरी... चांगला बदडून काढतो.
पत्नीला फरफटत घरी आणून त्याने घराचा दरवाजा आंतून बंद करून घेतला. सासूने व नवऱ्याने तिला प्रचंड मारहाण सुरुं केली. आरडा ओरड्यामुळे बाहेर आजूबाजूचे लोक गोळा झाले.
मारू नका.
बिचारी सून ! किती मारहाण सहन करते ? आपण काहीच करुं शकत नाही. त्यांनी घराचा दरवाजा आंतून बंद करुन घेतला आहे.

आत तिला मारहाण होत होती.
वाचवा.
मेले
वाचवा ! मला !!
धावा.... वाचवा
या कोयत्यानं तुझं मुंडकंच उडवितो.
एवढ्यात तेथे महिपती महाराज आले व त्यांनी तिच्या पतीचा हात धरला.
थांबा, कोयत्याने तिचे प्राण घेण्यापूर्वी माझेच शीर तोडा ! कारण चूक माझी आहे. तुमच्या गावात मी किर्तन केले म्हणून ती आली होती ना !!
तेवढ्यात पतीचे लक्ष दरवाजाकडे गेले.
आँ !! दरवाजा तर आतून पक्क बंद आहे. मग हे महाराज घरात आलेच कसे ?
तेवढ्यात महाराज गुप्त झाले.
हे काय ? महाराज आत्ता तर इथं होते. माझ्याशी बोलले अन् इतक्यांत गडप झाले ? दरवाजा तर बंदच आहे.

कुठं गेले महाराज ? चला मंदिरात जाऊन पाहूं.
दोघे मंदिरात आले. पहातात तर....
महाराज तर येथे किर्तनात मग्न आहेत.
मग घरीं आले होते ते कोण होते ?
सासऱ्याने चौकशी करीत सर्व हकिगत सांगितली
अरे रे !! पांडुरंगा. माझ्या भक्तांच्या रक्षणासाठी तुला माझे रुप घेऊन यावं लागलं ना !!
क्षमा करा महाराज, आम्ही आपल्याला ओळखलं नाही. आपण महान आहांत. आपण आमच्यावर दया करा व आम्हांला शिष्य करुन घ्या
महाराजांनी दोघांना अनुगृहीत केले व दिंडी पुढे निघाली.

जगद्गुरु शंकराचार्य
पांडुरंगाच्या दर्शनासाठी मी इथे आलो होतो. मी पाहिले की आपण पोथी वाचताना सद्गतीत झाले होते. आपल्या डोळ्यातून अश्रू ओघळत होते. असे आहे तरी काय या पोथीत ? पोथीचे नांव काय आहे आणि हिचे लेखक कोण आहे ?
या प्रासादिक पोथीचे नाव 'भक्ति-विजय' आहे. ताहराबादचे महिपती महाराज यांनी ती लिहिली आहे.
भक्तिविजय
मला त्यांची भेट घेता येईल का ?
त्यांना भेटायला मी उत्सुक आहे.
योगायोगाने महिपती महाराज येथेच पंढरपूरलाच आहेत. मी आपल्याला त्यांच्या घरी घेऊन जाऊं का ?
भक्तिविजय
ते पहा महाराज !
वारकरी आचार्यांना महिपती महाराजांकडे घेऊन आला. ते भोजनाच्या तयारीत होते. धोंडीभाऊ खंदरमाळ, नांदूरकर, केशवबुवा हे त्यांचे शिष्य तेथेच होते.
Vasant Vitankar # 9665632531


योगीराज आंत आले आणि त्यांनी समोरच कांदे व कांद्याच्या फोडी पाहिल्या तर किती वाईट दिसेल ?
महिपती महाराज कांदे झाकण्यासाठी त्यावर रुमाल टाकण्याच्या विचारात होते पण....
काय आश्चर्य ! कांदे व त्याच्या फोडीचे वांग्यात रुपांतर झाले.
भोजनानंतर महाराजांनी श्री शंकराचार्यांची पाद्यपूजा केली व त्यांना ग्रंथ दाखविला.
प्रत्यक्ष पांडुरंग मला कथन करतात आणि लिहितो असे वाटत होते.
शंकराचार्यांनी आपल्या आश्रमात चातुर्मास करुन ग्रंथ उतरवून घेतला.
चार महिन्यातील मुक्कामात मला आपल्याशी भरपूर चर्चा करता आली.
आपल्याशी केलेल्या चर्चेतून मला वेदाचे गुह्यज्ञान प्राप्त करता आले.
महिपतीच्या विशेष ज्ञानाची प्रशंसा करीत शंकराचार्यांनी निरोप घेतला.

लक्ष्मी तू परत माहेरी येशील
शिवराम उदावंत यांची विवाहीत कन्या लक्ष्मी ही ताहराबादला माहेरी आली होती.
महाराज, माहेरी आले. आपल्या पितृवत् प्रेमाच्या ओढीने आपल्या भेटीसाठी आले आहे पण माझे सासरे मला घेऊन जाण्यासाठी बैलगाडी घेऊन आले आहेत. मला त्यांच्या बरोबर गेलं पाहिजे. म्हणून मला आशीर्वाद देऊन निरोप द्या.
आज जाऊ नकोस उद्या जा.
नको महाराज, माझे सासरे फार कडक आहेत. मी जर आज गेले नाही तर ते रागावतील. मला आज गेलचं पाहिजे.
लक्ष्मी महाराजांचा निरोप घेऊन निघाली.
Vasant Vitankar # 9665632531
सासऱ्याने बैलगाडी जुंपून ठेवली होती. लक्ष्मी सासरी जायला निघाली.
येते महाराज.
माझ्या आयुष्याच्या शेवटच्या दिवशी तू माझ्या पासून दूर जाऊच शकत नाही.
47

Vasant Vitankar # 9665632531



Vasant Vitankar # 9665632531

गावाच्या वेशीपर्यंत दिंडी आली आणि एकाएकी महाराजांना भोवळ आली.
महाराजांना परत ताहाराबादला घेऊन जाण्यासाठी डोलीची व्यवस्था करा.
मला दिंडी सोडून परत यावे लागले. यावर्षी माझी वारी चुकणार आहे याचे मला अपार दुःख होत आहे. पांडुरंगा मी तुझा मोठा अपराधी आहे रे !
Vasant Vitankar # 9665632531



Vasant Vitankar # 9665632531



महिपतीने दिलेल्या पाहुणचाराचे प्रतिक म्हणून दरवर्षीच्या उत्सवात देवाला पुरणपोळीच्या नैवद्याबरोबर शेवग्याच्या पाल्याची भाजी व भाकरीचा प्रसाद महाराजांचे वंशज आजही दाखवितात.




शेवटी महानिर्वाणाचा दिवस उजाडला. श्रावण वद्य एकादशीला राऊळात किर्तन झाले. व्दादशीचे पारणे झाले.
हा भक्ती सोहळा असाच चालू ठेवा. हरिनामात आपले मन रमवा. संत समागम करा. अतिथींना विष्णुसमान मानून त्यांचे आतिथ्य करा. वंशजांनी कुलधर्म समजून 'वारी' चालू ठेवावी. आषाढी वद्य दशमी ते अमवस्येपर्यंत वार्षिक उत्सव चालू ठेवावा.
एवढे बोलून महाराजांनी देह ठेवला.
पुंडलिक वरदा.... हरी विठ्ठल.... आम्ही चाललो.....
सगळीकडे आकांत माजला.
महाराज गेले
महाराज निजधामास गेले.

Vasant Vitankar # 9665632531


तुझी भेट घ्यायची इच्छा होती. तू भेटलास, आनंद वाटला तू वाड्यावर जा मी परत तेथे येतोच.
शेकदार वाड्यावर पोहोचले.
हे काय महाराज !! आत्ता इतक्यात तर आपण मला भेटला होतात ना ?
आपणचं तर मला म्हणाला होतात की वाड्यावर जा. मी येतोच.... पण हे काय विपरित घडले !
शेकदार, आता दु:ख आवरा मरण कुणाला चुकलं आहे का ? आपण थकून भागून आलातं. दोन घास खाऊन घ्या.
तुम्ही वाड्यावर जा मी येतोच असं महाराज मला म्हणाले होते. ते येईपर्यंत मी अन्न ग्रहण करणार नाही.
गुरुला भक्ताची काळजी असते म्हणून महाराजांनी शेकदाराला १२ व्या दिवशी दर्शन दिले.
शेकेदार वाईट वाटून घेऊ नकोस. योग आहे तेथे वियोग आहे. जो आला त्याला गेलंच पाहिजे. तू दोन घास खाऊन घे. माझी आज्ञा आहे समज.
गुरु आज्ञा म्हणून शेकदाराने जेवण केले.

होय आम्ही पण तुमच्या सोबतच
याच वेळी एक चमत्कार घडला.
महाराज गेले. त्यांचे भक्त, शिष्यगण, नातेवाईक, गावकरी अंत्य दर्शनासाठी आले पण त्यांचे पट्टशिष्य धोंडीराम नांदूर खंदरमाळ हे काही आलेले दिसत नाही.

आपल्याला माहित नाही कां ? आताच निरोप आला की, महाराजांनी इकडे इहलोक सोडला आणि धोंडीभाऊंनीही त्यांच्या गांवी इहलोक सोडला.
कमाल आहे ! ही आहे भक्तीला मिळालेली प्रेमाची साथ.
Vasant Vitankar # 9665632531

धन्य आहे धोंडीभाऊंची त्यांनी दिलेला शब्द पुरेपूर पाळला.
म्हणजे ?
Vasant Vitankar # 9665632531
अरे, महाराज आणि धोंडीभाऊ एकमेकांचे मित्र आणि गुरु-शिष्य होते. एकदा वारीला जात असतांना.....
काय धोंडीबा, तुम्ही आम्हाला आयुष्यभर साथ दिली पण आम्ही निजधामास जातांना आम्हाला अशीच साथ करणार का ? आमच्या संगे तेथेही येणार का ?
अलबत् !! आम्ही तेथेही तुमची साथ सोडणार नाही. बरोबर येऊ
आणि महाराजांनी ताहराबादला देह ठेवला त्याच वेळी धोंडिबानेही खंदरमाळला देह ठेवला.
खरोखरच, अशी जीवाभावाची शिष्य परंपरा निर्माण करणारे महिपती महाराज धन्य होत!!

पाऊल घडी
देवा,दर वर्षी आषाढ वद्य नवमी ते अमावस्येपर्यंत आपण ताहराबादला यावे अशी विनंती आहे.
मी दरवर्षी येत जाईन.
पांडुरंगाने दिलेला शब्द ते पाळतात व दरवर्षी ताहराबादला येतात. याची प्रचिती देणारा ‘पाऊल घडी’ हा अद्‌भूत कार्यक्रम दरवर्षी साजरा केला जातो.
पांडुरंगाचे मूर्तीपासून मंदिराच्या गाभाऱ्यात हळद, कुंकू, बुक्का टाकतात.
यावर महाराजांचे वंशज आपले पागोटे अंथरुन त्यावर पण हळद-कुंकू टाकतात. वेदशास्त्र संपन्न गुरुकडून पूजा करुन देवाला येण्याचे आवाहन केले जाते.
Vasant Vitankar # 9665632531


रात्रभर भजन चालते.
सूर्योदयाच्यावेळी मंदिरात अंथरलेले पागोटे अलगत वरचे वर उचलून गोळा करतात.
पागोट्याखाली अंथरलेल्या हळदी-कुंकवावर पांडुरंगाची पाऊलें उमटलेली दिसतात.
हीच पांडुरंग येऊन गेल्याची प्रचिती मानली जाते. याला ‘पाऊलघडी’ असे म्हणतात.
हा कार्यक्रम दरवर्षी आजही
ताहराबादच्या मंदिरात हजारो
लोकांच्या साक्षीने होत असतो.
दरवर्षी ताहराबादला पांडुरंगाला
आणणारे संत महिपती
महाराजांच्या चरणी कोट्यावधी
प्रणाम-जयश्री महिपती महाराज



Vasant Vitankar # 9665632531

श्री सद्गुरु ह.भ.प. नाना महाराज
ताहराबादकर म्हणतात.

आला श्री हरि ज्या घरी परिसुनी वाणी सुधा प्रेमळा ।
सत्संगे रमला न जाय अजुनी सांडूनिया त्या स्थळा ॥
संताच्या स्तवणी हरीस सुखवी वाणी जयाची खरी ।
साष्टांगे प्रणिपात त्या महिपती संतास कोटीवरी ॥



Vasant Vitankar # 9665632531

लेखक परिचय

विजय प्रभाकर नगरकर

सेवानिवृत्त राजभाषा अधिकारी
बीएसएनएल, अहमदनगर, महाराष्ट्र

मातृभाषा: मराठी
जन्म स्थल: नेवासा (महाराष्ट्र)
हिंदी अभ्यास मंडळ नामित सदस्य:

- पुणे विश्वविद्यालय
  (1995-2000)
- औरंगाबाद विश्वविद्यालय
  (2000-2005)
- राष्ट्रीय दूरसंचार प्रशिक्षण संस्थान,जबलपुर

सदस्य सचिव: नगर राजभाषा कार्यान्वयन समिति, अहमदनगर, महाराष्ट्र
राजभाषा विभाग, गृह मंत्रालय,भारत सरकार (वर्ष 2000-2020)

पुरस्कार:

1. राजभाषा विभाग गृह मंत्रालय, मुम्बई क्षेत्रीय पुरस्कार 2015
2. नगर राजभाषा कार्यान्वयन समिति, गृह मंत्रालय, भारत सरकार सदस्य सचिव नाते उत्कृष्ट हिंदी कार्य हेतु तत्कालीन राष्ट्रपति श्री प्रणव मुखर्जी द्वारा प्रमाणपत्र देऊन सम्मानित - 2014
3. गृह पत्रिका 'कलश' बीएसएनएल, अहमदनगर उत्कृष्ट संपादन हेतु राजभाषा विभाग,गृह मंत्रालय,मुम्बई तर्फे पुरस्कार।

प्रकाशित साहित्य-

1. 1857 का संग्राम (हिंदी भाषांतर) एनबीटी, नई दिल्ली
2. समकालीन भारतीय साहित्य (साहित्य अकादेमी, नवी दिल्ली) भाषांतरित कविता प्रकाशित
3. तकनीकी हिंदी, सूचना प्रौद्योगिकी और हिंदी संबंधित अनेक लेख राजभाषा भारती, विश्व हिंदी, अभिव्यक्ति, रचनाकार मध्ये प्रकाशित।
4. राजभाषा सहायिका,बीएसएनएल
5. मराठी पुस्तक 'सचित्र संत महिपती'
6. काव्य संगम अनुवाद
7. डिजिटल हिंदी की यात्रा

संपादक

गृहपत्रिका 'कलश'

बीएसएनएल, अहमदनगर

(1998-2012)

विशेष रुचि: तकनीकी हिंदी, अनुवाद व राजभाषा हिंदी प्रचार-प्रसार

हिंदी ब्लॉग: राजभाषामानस

vpnagarkar@gmail.com

+919422726400

+919657774990

संत महिपती द्वारा स्थापित विठ्ठल मंदिरातील देव- बाळकृष्ण, देवी,गणपती

पादुका व शंख

संत महिपती कृत श्री भक्त विजय हस्तलिखित ग्रंथाची पाने





संत महिपती ताहराबादकर वाडा येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर

ह.भ.प. श्री बाळ कृष्ण कांबळे महाराज कीर्तन सेवा प्रदान करताना, त्यांचे स्वागत संत महिपती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष श्री रावसाहेब साबळे पाटील।